# प्रेस नोट दिनांक २७/०४/२०१९
## चंदननगर पोलीस स्टेशन, पुणे शहर
### बेहरे जेष्ठ नागरिक वृध्दाश्रम, खराडी येथे जेष्ठ नागरिकांना भेटुन अडचणींचे निराकरण केले बाबत..

दिनांक २६/०४/२०१९ रोजी १७.०० ते १८.०० वाजता दरम्यान चंदननगर पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक,कृष्णा इंदलकर,पोलीस निरीक्षक,गुन्हे,राजेंद्र काळे, पोहवा.३१४, हरीदास कदम, पोना.२६२३, जायभाये, पोशि.७६७९, पांडुरंग नाणेकर यांनी बेहरे जेष्ठ नागरीक आश्रम,खराडी या ठिकाणी जेष्ठ नागरीकांना सदच्छा भेट दिली. आश्रमातील जेष्ठ नागरिक यांच्याशी संवाद साधुन त्यांना काही अडचणी / शंका असल्यास त्या विचारून त्यांच्या अडिअडचणींचे निरसन केले. त्यांच्या सुरक्षिततेसंबंधाने चर्चा करुन त्यांना पोलीसांकडुन देण्यात आलेल्या जेष्ठ नागरीक ओळखपत्रा बाबत चर्चा केली. त्यांना मा.पोलीस आयुक्त सो, पुणे शहर यांनी सुरु केलेल्या भरोसा सेलचे कामगिरीची माहिती देवुन तेथील सेवांचा उपयोग करुन घेणेसाठी चर्चा केली. उपस्थित जेष्ठ नागरीकांनीही त्यांचे मनोगत व्यक्त करुन पोलीसांचे सहकार्य व करत असलेल्या कार्याचे कौतुक केले. त्यांना काही अडचण आल्यास चंदननगर पोलीस स्टेशन फोन नं.०२०/२७०१२३२१ किंवा पोलीस कंन्ट्रोल रूम नं.१०० वर संपर्क साधने बाबत माहिती दिली. सदर ठिकाणी ५० ते ६० जेष्ठ नागरीक जनसमुदाय हजर होता. सदर भेटीचे फोटो खाली सादर केले आहेत.




संगम सार्वजनिक सेवा समिती संचालित
बेहेरे वृध्द निवास
खराडी पुणे